**प्रेस नोट दिनांक २७/०४/२०१९**
**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**तक्रारदार यांचे पैसे रिफंड करुन दिले बाबत.**

चंदननगर पो. स्टे. येथे (१) दिनांक १४/०३/२०१९ रोजी इसम नामे श्री.प्रतिक एन.नायर,रा. शुभम सोसायटी,वडगांव-शेरी,पुणे यांनी समक्ष येवुन अर्ज दिला की, त्यांचे आयसीआयसीआय बँकेचे खात्या मधुन रु. ५०/- हजार काढले बाबतचा त्यांना मेसेज आलेला असुन ते पैसे त्यांनी काढले नाहीत. त्यांची फसवणुक झालेली आहे. त्यांचे अर्जावरुन पो स्टे. कडील सायबर पथकाचे पोउनि. किरण वराळ, पोशि. ८७९१, राहुल इंगळे, पोशि. ८५६४, किरण पालांडे, पोशि. ८८३२, अतुल जाधव यांनी तात्काळ आयसीआयसीआय बँकेचे खराडी शाखेशी पत्रव्यवहार करुन, ते पैसे अर्जदार यांना बँकेमार्फतीने रिफंड करुन दिलेले आहेत.

(२) दिनांक ०८/०४/१९ रोजी इसम नामे श्री. अमनदिप कौर, रा. खराडी, पुणे यांनी समक्ष पोलीस ठाणेस येवुन अर्ज दिला की, त्यांचे सिटी बँकेचे खात्यामधुन ऑनलाईन ७,२९२/- रुपये ट्रान्सपर झाले होते. सदर बँकेशी तात्काळ मेलव्दारे पत्रव्यवहार करुन अर्जदार यांना त्यांचे पुर्ण रक्कम रु. ७,२९२/- परत मिळवुन दिलेले आहेत.

(३) दिनांक १२/०३/१९ रोजी इसम नामे श्री. पार्थ पाठक, रा. चंदननगर, पुणे यांचे ॲक्सीस बँकेचे खात्यामधुन रु. १२,६३४/- ऑनलाईन ट्रान्सपर झालेबाबत त्यांनी पोलीस ठाणेस अर्ज सादर केला होता. त्यांचे ॲक्सीस बँकेशी तात्काळ मेलव्दारे पत्रव्यवहार करुन अर्जदार यांना त्यांचे पुर्ण रक्कम रु. १२,६३४/- परत मिळवुन दिलेले आहेत.

वरीलप्रमाणे एकुण तीन अर्जदार यांचे एकुण रुपये ६९,९२६/- त्यांना तात्काळ संबधीत बँकांशी पत्रव्यवहार करुन परत मिळवुन दिलेने अर्जदार यांना खुप आनंद होवुन, त्यांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगले कामगिरीबाबत समाधान व्यक्त करुन, पोलीसांचे आभार मानुन अभिनंदन केले आहे.

वरीलप्रमाणे चांगली कामगिरी चंदननगर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक – कृष्णा इंदलकर व पोनि. गुन्हे - राजेंद्र काळे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पथकाचे पोउनि. किरण वराळ, पोशि. ८७९१, राहुल इंगळे, पोशि. ८५६४, किरण पालांडे, पोशि. ८८३२, अतुल जाधव यांनी केलेली आहे.